**पुढील सरतपास अर्जदारतर्फे वकील श्री.डी.पी.केकडे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

११. नि.क्र.यु.डब्लु–१ वरील लेखी सरतपासातील सर्व मजकूर हा माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावरती माझी सही आहे.

**उलटतपास सामनेवालातर्फे वकील श्री.अजिंक्य मराठे यांचेमार्फत सुरु.**

१२. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला बॅकेमध्ये मी ब्रॅन्च मॅनेजर म्हणुन काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, पैशाच्या अपहाराच्या आरोपासाठी सामनेवालाने मला दि.२२/१२/२००७ रोजी आरोपपत्र बजावले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी खातेनिहाय चौकशी केल्यानंतर सामनेवाला बॅकेने मला कामावरून कमी केले. हे म्हणणे खरे आहे की, मी सामनेवाला बॅकेविरूध्द कामगार न्यायालय येथे दावा दाखल करून माझ्या कमी केलेल्या आदेशाला आव्हान दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसचा निकाल माझ्याविरूध्द लागला. हे म्हणणे खरे आहे की, कामगार न्यायालयाच्या निकालाविरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, सोलापूर येथे रिव्हीजन दाखल केली होती आणि ती रिव्हीजन डिसमिस झाली. हे म्हणणे खरे आहे की, मे.औद्योगिक न्यायालय, सोलापूर यांच्या निकालाविरूध्द मी कुठेही याचिका दाखल केली नाही अथवा मुंबई उच्च न्यायालयमध्ये रिट पिटीशन दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मे. औद्योगिक न्यायालय, सोलापूर यांचा न्यायनिर्णय आजतागायत अस्तित्वात आहे.

१३. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा औद्योगिक कलह कायदा कलम ३३–(क) (२) अंतर्गत दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरच्या अर्जाद्वारे अर्जित रजा, वैद्यकीय रजा आणि बोनस याची मागणी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा अर्ज मी कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालय येथे मी दाखल केलेल्या प्रकरणांच्या निकालाच्या आधारावर केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही निकालांमध्ये मला प्रस्तुत प्रकरणात मागणी केलेली रक्कम द्यावी असा आदेश झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की,

मी मागणी केल्याप्रमाणे रक्कम मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रस्तुत प्रकरणात मागणी केलेला रकमा देण्याबाबत इतर कुठल्याही न्यायालयाचा आदेश झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

KALYANI RAJARAM ADAKE
Digitally signed by KALYANI RAJARAM ADAKE
Date: 2025.11.07 17:33:41 +0530

(क. रा. आडके)

सोलापूर. पिठासिन अधिकारी तथा न्यायाधीश,
दिनांक : ०७/११/२०२५ कामगार न्यायालय, सोलापूर.